शिवसेनाप्रमुखांचा ब्रॅण्ड पुसण्याचा प्रयत्न झाल्यास तुमचे नामोनिशाण मिटवू- ठाकरे

मुंबई (प्रतिनिधी)– मुंबई ही मराठी माणसाच्या ताब्यातच राहणार आहे. मराठी माणसांसाठी लढणाऱ्या शिवसेनाप्रमुखांचा ब्रॅण्ड पुसण्याचा तुम्ही प्रयत्न कराल तर महाराष्ट्रातून तुमचे नामोनिशाण मिटवून टाकू. कमॉन किल मी असे माझे गद्दारांना आव्हान आहे. मात्र येताना रुग्णवाहिका घेऊन या. कारण येताना सरळ आणि जाताना आडवे होऊन जाणार आहात, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी दिला. मराठी शक्ती एकत्र येऊ नये म्हणून यांच्या मालकांचे नोकर हॉटेलांमध्ये भेटीगाठी घेत असल्याचा आरोप लावताना ठाकरे यांनी जे शिवसैनिकांच्या आणि राज्याच्या मनात आहे तेच होईल, असे सांगत मनसेसोबतच्या युतीचे संकेत दिले. तसेच हिंमत असेल तर हिंदीची सक्ती करूनच दाखवा, असे आव्हानही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिन सोहळा आज येथील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. त्यावेळी बोलताना ठाकरे यांनी भाजप आणि शिंदे गटाचा आपल्या शैलीत समाचार घेतला. आज तर मी तयारीने उभा आहे. नाना पाटेकर त्यांच्या प्रहार चित्रपटात गुंडासमोर उभे राहताना, समोरच्यांना कम ऑन किल मी असे सांगतो. तसेच मी या गद्दारांसमोर उभे राहून कम ऑन किल मी असे सांगतोय. असेल हिंमत तर या अंगावर. फक्त अंगावर येणार असाल तर एक गोष्ट नक्की करा. अमिताभ बच्चनच्या चित्रपटाप्रमाणे म्ब्युलन्स घेऊन या, असे आव्हान देत उद्धव ठाकरे यांनी आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिंदे गटाशी पूर्ण ताकदीनिशी दोन हात करण्याची तयारी दाखवी.

जे आपला बाप बदलतात, ज्यांना राजकारणात पोरं होत नाही, असे लोक जेव्हा आपल्या घराणेशाहीवर टीका करतात तेव्हा मला त्यांची कीव येते. अरे तुला राजकारणात पोरं होत नाहीत तर मी काय करु. आमच्याकडे आहेत, घ्यायची असेल तर घे. किती पाहिजेत असा सवाल करीत उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना नाव न घेता लक्ष्य केले. भाजप पक्ष पण असाच आहे, ज्या सरदार पटेल यांनी संघावर बंदी आणली होती त्याच पटेलांना नेता म्हणून जगातला सर्वात मोठा पुतळा बांधण्याची वेळ यांच्यावर आली. हे यांचे कर्तृत्व आणि आपल्याला शिकवतात हिंदुत्व, अशी टीकाही त्यांनी केली. तुम्ही सैन्याचे पाय बांधले नाही तर आपण पाकिस्तान घेतलाच असता. पण ट्रम्पचा फोन आल्यावर तुमचा आवाजच गेला. चार अतिरेकी आलेच कसे? अतिरेकी गेले कुठे? पाताळात गेले, आकाशात गेले की भाजपात गेले? आता हे फक्त दाऊदला घ्यायचे बाकी आहेत. आता देवेंद्र फडणवीसांची एसआयटी कुठे गेली. त्यांच्या एसआयटीची आता सगळ्यांना फिरवणारी एसटी झाली का, असा सवालही ठाकरे यांनी केला.

त्यांचा जीव महापालिकेच्या तिजोरीत

शिंदे यांचा उद्धव ठाकरेंवर घणाघात; महापालिकेची तिजोरी फोडणाऱ्यांना मुंबईचा लढा आठवला

मुंबई (प्रतिनिधी)– राक्षसाचा जीव जसा पोपटात असतो, तसा त्यांचा जीव मुंबई महापालिकेच्या तिजोरीत आहे. इतकी वर्ष सत्तेत राहून महापालिकेची तिजोरी फोडणाऱ्यांना मुंबईचा लढा आठवला, असा घणाघात उपमुख्यमंत्री तथा शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता केला. मुंबई महाराष्ट्राचीच राहणार, कुणाचा बाप जरी आला किंवा सात पिढ्या खाली उतरल्या तरी मुंबई महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही, असेही शिंदे यांनी ठणकावून सांगितले.

येथील वरळी डोम येथे शिवसेनेच्या ५९ व्या वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. आपला मेळावा बाळासाहेबांच्या विचारांचा, तर दुसरा मेळावा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे. आपण बाळासाहेबांचा विचार जिवापाड जपला. त्यामुळेच शिवसेनेची घोडदौड जोरात सुरू आहे. सरडाही रंग बदलतो, पण यांच्या इतके लवकर रंग बदलत नाही. बाळासाहेबांनी हिंदुत्वासाठी मतदानाचा अधिकार गमावला, पण हिंदुत्व सोडलं नाही. पण त्यांचे वारसदार म्हणवणारे सत्तेसाठी लाचार झाले. बाळासाहेब असते तर यांना उलटं टांगून खालून मिरचीचा धूर दिला असता, असा हल्लाबोल शिंदे यांनी केला. आज ज्यांना मराठी माणसाची आठवण होत आहे. त्यांच्यामुळेच मराठी माणूस मुंबईबाहेर गेला. आता मराठीच्या नावाने गळे काढत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

कोविड सेंटर, खिचडी, बॉडीबॅग, कचरा, मिठी नदी गाळ, रस्त्यांवर खड्डे आणि डांबरात पैसे खाल्ले तसेच मुंबईकरांच्या आरोग्याशी खेळ केला. इतकी वर्ष तुम्ही सत्तेत होता, तेव्हा पालिकेची तिजोरी फोडली आणि आता सत्ता गेल्यावर मुंबईचा लढा आठवलाय, अशी बोचरी टीका करत शिंदे यांनी, लढण्यासाठी घराबाहेर पडावं लागते. लोकांशी संवाद साधावा लागतो. आता तुम्ही जे काही बाहेर पडताय ते आमच्यामुळे पडताय, असा टोला ठाकरे यांना लगावला. मिठी नदीच्या मगरमिठीतून कोणी सुटणार नाही. आता एकाची चौकशी सुरु आहे, त्याने तोंड उघडले तर अनेकांचा मोरया होईल, असा सूचक इशारा एकनाथ शिंदे यांनी ठाकरे यांना दिला.

मुंबईतील उबाठाचे ५० विद्यमान नगरसेवक इतर पक्षातले ६० ते ६५ नगरसेवक शिवसेनेत दाखल झाले आहेत. येत्या निवडणुका महायुतीतच लढायच्या आहेत. कार्यकर्त्यांनी निवडणुका जिंकण्याच्या कामाला लागा, असे आवाहन शिंदे यांनी यावेळी केले. आगामी महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत महायुतीचाच भगवा फडकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमनपदी संगीता कपाळे तर व्हा.चेअरमनपदी स्वराज गीते

राहुरी (तालुका प्रतिनिधी)– राहुरी फॅक्टरी येथील साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमनपदी संगीता शिवाजीराव कपाळे तर व्हाईस चेअरमनपदी स्वराज विष्णुपंत गीते यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.

साई आदर्श पतसंस्थेसाठी सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. काल गुरुवारी संस्थेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी एम. ए.शेख यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन व व्हा.चेअरमन पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली.

चेअरमन पदासाठी संगीता शिवाजीराव कपाळे यांच्या नावाची सूचना बाळासाहेब मुसमाडे यांनी मांडली तर रंगनाथ घाडगे यांनी अनुमोदन दिले. तर व्हा. चेअरमनपदासाठी स्वराज गीते यांच्या नावाची सूचना सुभाष विटनोर यांनी मांडली तर चांगदेव पवळे यांनी अनुमोदन दिले.

यावेळी अक्षय कपाळे, सुरेश शेजुळ, रंगनाथ घाडगे, बाळासाहेब मुसमाडे, पारस नहार, फैमीदा शेख, चांगदेव पवळे, चांगदेव साळवे, सुभाष विटनोर यांची संचालक पदी निवड करण्यात आली.

यावेळी चेअरमन संगीता कपाळे यांनी शिवाजीराव कपाळे यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही काम करत आहोत. पतसंस्थेच्या दोन नवीन शाखांना सहकार खात्याची परवानगी मिळाली असून त्या या आर्थिक वर्षात सुरू करण्यात येतील. असे सांगीतले.

यावेळी साई आदर्श मल्टीस्टेट व नगर जिल्हा स्थैर्यनिधी संघाचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, योगप्रशिक्षक किशोर थोरात, साई आदर्श मल्टीस्टेटचे व्यवस्थापक सचिन खडके,साई आदर्श पतसंस्थेचे व्यवस्थापक गोपीनाथ हारगुडे, रवींद्र झावरे आदिंसह पतसंस्थेचे व साई आदर्श मल्टीस्टेटचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नवीन पदाधिकारी व संचालक मंडळांचे महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेशराव वाबळे, नागेबाबा मल्टीस्टेटचे चेअरमन कडूभाऊ काळे यांनी अभिनंदन केले

साई संस्थान इनसोर्स कर्मचाऱ्यांच्या रजा व सुट्यांना अखेर मंजुरी- गाडीलकर

शिर्डी (प्रतिनिधी)– श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबा संस्थानच्या इनसोर्स कर्मचाऱ्यांच्या गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रजा व सुट्ट्यांना अखेर मंजुरी मिळाली असून त्याची अंमलबजावणी देखील सुरू करण्यात आली आहे. याचबरोबर संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणारा रिक्रूटमेंट रुलचा विषय अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. हे नियम मंजूर झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या बहुतांश प्रश्नांची सोडवणूक होईल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी व्यक्त केला.

साई संस्थान एम्प्लॉ सोसायटी शिर्डी यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. साईबाबा संस्थान देशातील दुसऱ्या क्रमांकाचे धनिक देवस्थान असले तरी येथे कार्यरत असलेल्या हजारो कर्मचाऱ्यांना अद्याप अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे, असेही त्यांनी सांगितले. गेल्या दहा वर्षांपासून संस्थेच्या रिक्रूटमेंट रुल्स संदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. संस्थेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून आता तो अंतिम टप्प्यात असल्याने मंजुरीसाठी केवळ काही औपचारिकताच शिल्लक असल्याचे गाडीलकर यांनी स्पष्ट केले. हे नियम मंजूर होताच कर्मचाऱ्यांची बिंदुनामावली तयार होणार असून यामुळे कालबद्ध पदोन्नती, नवीन पदांची निर्मिती व भरतीचा मार्ग मोकळा होणार आहे. अंदाजे एका महिन्यात यास शासनाची मान्यता मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. क्षणिक लाभांच्या मागे न लागता बाबांच्या सेवेत मन लावून काम करा. इथे कोणताही स्पेअर पर्याय नाही. चूक केल्यास बाबांच्या दरबारात ती लगेच समजते. म्हणून प्रामाणिक सेवा करा, बाबांची कृपा नक्कीच तुमच्या पाठीशी राहील, असा भावनिक सल्लाही गाडीलकर यांनी कर्मचाऱ्यांना दिला.

८२ हजार हेक्टरवर कडधान्य पिकांचा पेरा

पावसाची रिपरिप; खरीपाच्या पेरण्या संथ गतीने

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्ह्यात यंदा १९ जूनपर्यंत ८२ हजार हेक्टरवर खरीप हंगामातील कडधान्य पिकांची पेरणी पूर्ण झालेली आहे. दरम्यान, जिल्ह्यात अनेक भागात ढगाळ वातावरण असून पावसाची रिपरिप सुरू आहे. काही ठिकाणी अद्याप वाफसा न झाल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या संथ गतीने सुरू आहेत.

कृषी विभागाच्या माहितीनूसार नगर जिल्ह्याच्या दक्षिण भागात कडधान्य पिकाचे क्षेत्र अधिक आहे. या ठिकाणी मूग, उडिद यासह तूर पिक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. नगर, पारनेर, जामखेड, कर्जत, पाथर्डी या भागात मूग आणि उडिद पिकाचे क्षेत्र अधिक असून उर्वरित ठिकाणी सिंचनाची सोय असल्याने शेतकरी सोयाबीन, कपाशी आणि चारा पिके घेत असतात. यंदा मे महिन्यांत जिल्ह्याच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. यामुळे शेतकऱ्यांना कडधान्य पिकांच्या पेरणीस संधी मिळाली. दरम्यान, दक्षिणेतील अनेक तालुक्यात अद्याप पेरणीसाठी वापसा नसल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या या संथगती सुरू आहेत.

जिल्ह्यात खरीप हंगामासाठी कृषी विभागाकडून ७ लाख ८८ हजार सरासरी क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले. आतापर्यंत जिल्ह्यात २ लाख ३८ हजार हेक्टरवर पेरण्या झालेल्या असून यात कडधान्य पिकांचा पेरा हा १ लाख ३८ हजार हेक्टर आहे. यात तूर पिकाचे क्षेत्र १७ हजार २९४ हेक्टर, मूग २८ हजार १४५ हेक्टर, उडिद ३५ हजार ८९८ हेक्टर व इतर कडधान्य ६२८ हेक्टर असे एकूण ८२ हजार ३३७ हेक्टर कडधान्य पिकांची पेरणी झालेली आहे. यासह जिल्ह्यात बाजारी पिकाची २२ हजार ७३५ हेक्टर, मका ३१ हजार ३८८ हेक्टर, सोयाबिन ४९ हजार ७२९ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली आहे.

५० हजार हेक्टरवर कपाशी लागवड

जिल्ह्यात अनेक ठिकाणी जून महिन्यांच्या आधी कपाशी लागवड सुरू झाली. आतापर्यंत जिल्ह्यात ५० हजार १८६ हजार हेक्टरवर कपाशी लागवड झालेली आहे. हे क्षेत्र येत्या काही दिवसात दुप्पट होण्याची शक्यता आहे. कृषी विभागाने यंदा जिल्ह्यात १ लाख ५६ हजार हेक्टरवर कपाशी लागवड प्रस्तावित केलेली आहे. अनेक ठिकाणी उशीरापर्यंत कपाशी लागवड सुरू राहणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

जवखेडे, कोपर्डी प्रकरणाचे सरखोल तपासक

डॉ. गोर्डे यांची पुन्हा नगर जिल्ह्यात बदली

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– पोलीस खात्यात तपास कौशल्यासाठी ओळखले जाणारे आणि जवखेडे, कोपर्डी सारख्या संवेदनशील प्रकरणांचा सखोल तपास करणारे पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे यांची पुन्हा एकदा अहिल्यानगर जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी नुकताच यासंदर्भातील आदेश जारी केला असून, त्याचबरोबर गुन्हे अन्वेषण शाखा, मुंबई येथे कार्यरत असलेले प्रवीण साळुंखे यांचीही अहिल्यानगर जिल्ह्यात नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. गोर्डे यांचा पोलीस खात्यातील कार्यकाळ हा अत्यंत प्रभावी राहिला आहे. त्यांनी श्रीरामपूर तालुका, नगर तालुका व नेवासा पोलीस ठाण्यांमध्ये सेवा बजावताना गुन्हे उकलण्यात व कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तसेच, स्थानिक गुन्हे शाखेमध्ये कार्यरत असताना त्यांनी अनेक गुन्हे उघडकीस आणून खळबळजनक प्रकरणे उकलली होती. यामुळेच त्यांच्या कामाची दखल घेत त्यांची बदली लाचलुचपत प्रतिबंधक विभागात करण्यात आली होती. तिथेही त्यांनी कर्तव्यनिष्ठा आणि निडर कार्यपद्धतीचे दर्शन घडविले. त्यानंतर त्यांना पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती मिळून जालना जिल्ह्यात बदली करण्यात आली होती. आता पुन्हा एकदा त्यांची अहिल्यानगर जिल्ह्यात बदली झाल्यामुळे गुन्हे तपास यंत्रणेला बळकटी मिळणार आहे. दरम्यान, प्रवीण साळुंखे यांचीही नियुक्ती अहिल्यानगर जिल्ह्यात करण्यात आली आहे. ते याआधी मुंबई येथील गुन्हे अन्वेषण शाखेत कार्यरत होते. या दोन्ही अधिकाऱ्यांच्या बदलीमुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास, तसेच गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नवे संकेत मिळणार आहेत, असा विश्वास पोलीस खात्याच्या वर्तुळात व्यक्त होत आहे.

डॉ. बोरगेंचे नाव वगळण्याचा पोलीस अहवाल न्यायालयाने फेटाळला

साडेसोळा लाखांचा अपहार : २७ जून रोजी पुढील सुनावणी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– महापालिकेच्या आरोग्य विभागातील साडेसोळा लाखांच्या अपहार प्रकरणी दाखल गुन्ह्यातून मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याबाबत कोतवाली पोलिसांनी न्यायालयात सादर केलेला अहवाल न्यायालयाने अमान्य केला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २७ जून रोजी होणार असून, डॉ. बोरगे यांना समन्स बजावण्याचे निर्देश न्यायालयाने दिल्याची माहिती सरकारी वकील अमित यादव यांनी दिली.

आरोग्य विभागातील अपहार प्रकरणी राष्ट्रीय आरोग्य अभियानचे शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोग्य विभागाचे प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी याप्रकरणी फिर्याद दिलेली आहे. त्यानंतर दोघांना अटकही करण्यात आली होती. या गुन्ह्याच्या तपासात पोलिसांना गुन्ह्यात डॉ. बोरगे यांचा सहभाग आढळून आला नाही. डॉ. बोरगे यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा नाही, असा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला होता. या अहवालावर न्यायालयात सुनावणीवेळी फिर्यादीच्या वतीने म्हणणे सादर करण्यात आले. 'डिजिटल की'साठी वापरले गेलेले दोन्ही मोबाईल नंबर रणदिवे यांच्याशी संबंधित असले, तरी सदर व्यवहाराबाबत डॉ. बोरगे यांना माहिती होती. त्यांनी प्रस्तावावर सही केलेली आहे. निधी प्राप्त झाल्यापासून ते पैसे काढल्याच्या कालावधीत ते कार्यरत होते. सदर प्रकार घडल्यानंतर त्यांनी रणदिवे यांच्यावर कारवाई केलेली नाही, असा दावा न्यायालयात करण्यात आला. याबाबत काही कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने डॉ. बोरगे यांचे नाव वगळण्याचा अहवाल अमान्य केल्याचे ॲड. यादव यांनी सांगितले.

शरद कोळसे यांचे निधन

राहुरी (प्रतिनिधी)– राहुरी तालुक्यातील गुहा येथील प्रगतशील शेतकरी शरद उत्तमराव कोळसे (वय ४५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, चुलते, भाऊ असा मोठा परिवार आहे. ते न्यायाधिश प्रमोद कोळसे, ॲड. प्रसाद कोळसे यांचे चुलत बंधू तसेच सामाजिक कार्यकर्ते बबनराव कोळसे यांचे पुतणे होत. त्यांच्यावर गुहा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

पान १ वरुन

भंडारदरा पाणलोटात जोरदार पाऊस

क्षमतेचा वाकी तलाव ओव्हरफ्लो झाला आहे. निळवंडे धरणातीलही पाणीसाठा वाढू लागला आहे. पाणलोटात मुसळधार पाऊस पडत असून जनजीवन गारठले असून पशुधन ही गारठले आहे नेकलेस, नाणी, पांजरे आदी फॉल आक्राळ विक्राळ रुद्र रूप धारण करून वाहत आहेत. त्यामुळे भंडारदरा धरणात पाणीसाठ्यात तासागणिक वाढ होत आहे. जोरदार वारा असून काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याचे दिसत आहेत. तसेच भात खाचरे ही तुडुंब भरले, भात शेती ही धोक्यात आली असून शेतकरी चिंताग्रस्त बनला आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून जनावरांना गोठ्यात बांधून ठेवण्यात आले आहे. काल सकाळपर्यंत नोंदवला गेलेला पाऊस असा (मिमीमध्ये) भंडारदरा १२७, घाटघर १५९, पांजरे १२५, रतनवाडी १६९.

मुळा पाणलोटात जोरदार पाऊस

संततधार पावसाने आवक वाढून ६०० दलघफू क्षमतेचे पिंपळगाव खांड धरण ओव्हर फ्लो झाले आहे. तर मुळा नदीच्या उगमावर आंबित येथे असणारे १९३ दलघफू क्षमतेचे आंबित धरण २७ मे रोजी दुपारी १ वाजता ओव्हर फ्लो झालेले आहे. जिल्ह्यातील हे पहिले धरण भरले होते. त्यानंतर आता पिंपळगाव खांड हे दुसरे धरण भरले आहे. सध्या २१ हजार ३७६ क्यूसेसने पाण्याचा विसर्ग नदीतून मुळा धरणाकडे झेपावत आहे. यामुळे मुळा खोऱ्यात आनंद व्यक्त होत आहे.

गोदावरी दुथडी...

पाण्याची आवक झाली. हे पाणी पाऊण टीएमसीहुन अधिक आहे. काल सकाळी ६ वाजता दारणात ३३४३ दलघफू पाणीसाठा झाला होता. तो ४६.७६ टक्के इतका झाला होता. काल दुपारी १२ वाजेपर्यंत ५० टक्के इतका झाला. द्वार परिचालन सुचिनुसार जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात जितके टक्के पाणीसाठा साठविणे अपेक्षित आहे. त्या पेक्षा जादा आलेले पाणी नदीत पात्रात सोडावे लागते. त्यामुळे दारणा ४८.१५ टक्क्यांच्या पुढे गेल्याने त्यातून काल दुपारी ३ वाजता जलविद्युत प्रकल्पाच्या गेटमधून ११०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला. धरणातील आवक पाहता धरणाच्या वक्राकार दरवाजामधूनही विसर्ग करण्यास सुरुवात केली. काल रात्री ७.३० वाजता दारणातून ३०६२ क्युसेकने विसर्ग सोडण्यात येत होता. रात्री १० वाजता हा विसर्ग ४७४२ क्युसेकपर्यंत वाढविण्यात आला. दरम्यान, दारणाच्या पाणलोटातील इगतपुरी तालुक्यात पावसाचा जोर असल्याने त्या तालुक्यातील नदी, नाले दुथडी भरुन वाहत आहे. त्यामुळे दारणात मोठी आवक होऊ शकते. खऱ्या अर्थाने दारणाच्या पाणलोटात मान्सून सक्रीय झाला आहे. बुधवार रात्री व गुरुवार दुपारी ३ वाजे पर्यंत पावसाने सह्याद्रीचा घाटमाथा झोडपून काढला. यंदा दारणात जूनमध्ये ३५ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे १५ टक्के साठा पावसाने होऊन आता विसर्ग सुरु झाला आहे. हा विसर्ग टप्प्याटप्याने वाढविला जाणार आहे. दारणाच्या वर असलेल्या भावली धरणाच्या परिसरात काल सकाळी ६ पर्यंत मागील २४ तासांत १५९ मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे भावलीतही पाण्याची आवक होऊ लागली आहे. १ जून पासुन भावलीला काल पर्यंत ४९८ मिमी एकूण पाऊस नोंदला गेला आहे. वाकी येथे १०३ मिमी, भाम च्या भिंतीजवळ ९० मिमी पावसाची नोंद झाली. गंगापूर धरणाच्या पाणलोटातही दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. गंगापूर धरणही निम्मे भरले आहे. त्यामुळे या धरणातूनही आज शुक्रवारी सकाळी ६ वाजता विसर्ग सोडण्यात येणार आहे. सुरुवातीला ५०० क्युसेक ने विसर्ग करण्यात येणार आहे. त्यानंतर तो वाढवित सकाळी ९ वाजता १००० क्युसेक इतका करण्यात येणार आहे. नवीन पाण्याच्या आवके नुसार गंगापूरातील विसर्ग वाढविला जाणार आहे. त्यामुळे गोदाकाठावर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गंगापूर च्या भिंतीजवळ काल सकाळी ६ वाजता मागील संपलेल्या २४ तासांत ८० मिमी पावसाची नोंद झाली. दारणाच्या पाणलोटातील त्र्यंबकला १४२ मिमी पावसाची नोंद झाली. अंबोलीला ९७ मिमी, गौतमी गोदावरीला १०५ मिमी पावसाची नोंद झाली. कश्यपीला ९२ मिमी पावसाची नोंद झाली.

दरम्यान, नांदूर मधमेश्वरच्या पाणलोटातही जोरदार पाऊस झाला. त्यामुळे या बंधाऱ्यात छोट्या मोठ्या नद्या तसेच ओढे ओसंडून वाहुन येत आहेत. त्यामुळे नवीन पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. हा बंधारा अगोदर तुडुंब भरला असल्याने नवीन येणारे पाणी गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने वेगाने वाहत आहे. काल सकाळी १० वाजता या बंधाऱ्यातून गोदावरीत सुरुवातीला ८०७ क्युसेक ने विसर्ग करण्यात येत होता. त्यानंतर तो वाढवत दुपारी १२ वाजता १६१४ क्युसेक इतका करण्यात आला. दुपारी ३ वाजता तो आणखी वाढवत ३२२८ असा दुप्पट करण्यात आला. नंतर तो ४८४२ क्युसेक करण्यात आला. काल सायंकाळी वाजता गोदावरी नदीत या बंधाऱ्यातून १२६२० क्युसेक ने विसर्ग करण्यात येत होता. दारणा तसेच गंगापूर व अन्य छोट्या नद्या, ओढे यांचे पाणी या बंधाऱ्यात दाखल होवून गोदावरीचा विसर्ग रात्रीतून वाढू शकतो. त्यामुळे गोदाकाठाला प्रशासनाने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गोदावरी दुथडी भरुन वाहु लागली आहे.

जायकवाडी २९.६६ टक्के

- दरम्यान खाली जायकवाडी जलाशयात काल गुरुवार च्या आकडेवारी नुसार जायकवाडीत उपयुक्तसाठा २९.६६ टक्के इतका आहे. मागील वर्षी कालच्या तारखेला जायकवाडीत उपयुक्तसाठा ५.१५ टक्के इतका होता. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा मात्र जायकवाडीची परिस्थिती चांगली आहे. काल सकाळी ६ पर्यंत मागील २४ तासात जायकवाडी जलाशयात ८१९ क्युसेक पाणी नव्याने दाखल झाले.